RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक १५] सोमवार, एप्रिल २२, २०१३/वैशाख २, शके १९३५ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २५.००

### असाधारण क्रमांक ४७

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

गृह विभाग

जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, ३० वा मजला, कफ परेड, मुंबई ४०० ००५, दिनांक २० एप्रिल २०१३.

अधिसूचना

मोटार वाहन अधिनियम, १९८८.

क्रमांक एमव्हीआर. ०४०८/प्र.क्र.२१२/पुनर्बांधणी-२५/परि २.— मोटार वाहन अधिनियम, १९८८ ( १९८८ चा ५९ ), हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, याच्या कलम ६५ च्या पोट-कलम (२) चे खंड ( घ ) व (त) व कलम २११ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९, यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करण्याचे योजिले आहे. याद्वारे उक्त अधिनियमांच्या कलम २१२ च्या पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वीच प्रसिद्ध करण्यात आलेले पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र मोटार वाहन ( पहिली सुधारणा ) नियम, २०१३ असे म्हणावे.

२. तो दिनांक १५ मे २०१३ पासून अंमलात येईल.

३. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५४ क ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" ५४-क नोंदणी चिन्हाचें नेमून देणे.— (१) मोटार वाहनांना नेमून द्यावयाचे नोंदणी चिन्ह हे, अधिनियमाच्या कलम ४१ च्या पोट-कलम (६) अन्वये, केंद्र सरकारने काढलेल्या अधिसूचनेनुसार असेल.

(२) केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नमुना क्रमांक २० मधील अर्ज मिळाल्यावर, नोंदणी प्राधिकारी, नेमून दिलेल्या शेवटच्या नोंदणी चिन्हांनंतर अनुक्रमाने येणारे नोंदणी चिन्ह नेमून देईल.

(३) नोंदणी प्राधिकारी, खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे फी प्रदान केल्यावर, नोंदणी चिन्हांमधून, मोटार वाहनांच्या मालकांसाठी त्यांच्या पसंतीचे नोंदणी चिन्ह राखून ठेवील :-

| अ.क्र. (१) | नोंदणी चिन्हे (२) | दुचाकी व तीन चाकी आणि परिवहन वाहने यांच्या व्यतिरिक्त (३) | दुचाकी व तीन चाकी आणि परिवहन वाहने (४) |
|---|---|---|---|
| १ | ०००१ .. | *३,००,००० | ५०,००० |
| २ | ०००९, ००९९, ०७८६, ०९९९, ९९९९. .. | १,५०,००० | २०,००० |
| ३ | ०१११, ०२२२, ०३३३, ०४४४, ०५५५, ०६६६, ०७७७, ०८८८, ११११, २२२२, ३३३३, ४४४४, ५५५५, ६६६६, ७७७७, ८८८८. .. | ७०,००० | १५,००० |
| ४ | ०००२, ०००३, ०००४, ०००५, ०००६, ०००७, ०००८, ००१०, ००११, ००२२, ००३३, ००४४, ००५५, ००६६, ००७७, ०१००, ०१२३, ०२३४, ०३४५, ०४५६, ०५००, ०५०५, ०५६७, ०६७८, ०७८९, ०९००, १०००, १००१, १२३४, १५१५, १८१८, २३४५, २५२५, २७२७, ३४५६, ३६३६, ४५४५, ४५६७, ५०००, ५४५४, ५६७८, ६३६३, ६७८९, ७००७, ७२७२, ८१८१, ९०००, ९००९, ९०९०. .. | ५०,००० | १०,००० |
| ५ | ००८८, ०१०१, ०२००, ०२०२, ०३००, ०३०३, ०४००, ०४०४, ०६००, ०६०६, ०७००, ०७०७, ०८००, ०८०८, ०९०९, १०१०, १०११, ११००, １११२, १२००, १२१२, १२१३, १२२१, १३००, १३१३, १३१४, १३३१, १४००, १४१४, १४१५, १५००, १५१६, १६००, १६१६, १६१७, १७००, १७१७, १७१८, १८००, १८१९, १९००, १९१९, १९२०, २०००, २००२, २०२०, २०२१, २१००, २१२१, २१२२, २२००, २२२३, २३००, २३२३, २३२४, २४००, २४२४, २४२५, २५००, २५२६, २६००, २६२६, २६२७, २७००, २७२८, २८००, २८२८, २८२९, २९००, २९२९, २९३०, ३०००, ३००३, ३०३०, ३०३१, ३१००, ३१३१, ३१३२, ३२००, ३२३२, ३२३३, ३३००, ३३३४, ३४००, ३४३४, ३४३५, ३५००, ३५३५, ३५३६, ३६००, ३६३७, ३७००, ३७३७, ३७३८, ३८००, ३८३८, ३८३९, ३९००, ३९३९, ३९४०, ४०००, ४००४, ४०४०, ४०४१, ४१००, ४१४१, ४१४२, ४२००, ४२४२, ४२४३, ४३००, ४३४३, ४३४४, ४४००, ४४४५, ४५००, ४५४६, ४६००, ४६४६, ४६४७, ४७००, ४७४७, ४७४८, ४८००, ४८४८, ४८४९, ४९००, ४९४९, ४९५०, ५००५, ५०५०, ५०५१, ५१००, ५१५१, ५१५२, ५२००, ५२५२, ५२५३, ५३००, ५३५३, ५४००, ५४५५, ५५००, ५५५६, ५६००, ५६५६, ५६५७, ५७००, ५७५७, ५७५८, ५८००, ५८५८, ५८५९, ५९००, ५९५९, ५९६०, ५९९५, ६०००, ६०६०, ६०६१, ६१००, ६१६१, ६१६२, ६२००, ६२६२, ६२६३, ६३००, ६३६४, ६४००, ६४६४, ६४६५, ६५००, ६५६५, ६५६६, ६६००, ६६६७, ६७००, ६७६७, ६७६८, ६८००, ६८६८, ६८६९, ६९००, ६९६९, ६९७०, ७०००, ७०७०, ७०७१, ७०८०, ७१००, ७१७१, ७१७२, ७२००, ७२७३, ७३००, ७३७३, ७३७४, ७४००, ७४७४, ७४७५, ७५००, ७५७५, ७५७६, ७६००, ७६७६, ७६७७, ७७००, ७७७८, ७८००, ७८७८, ७८७९, ७९००, ७९७९, ८०००, ८००८, ८०८०, ८०८१, ८१००, ८१८२, ८२००, ८२८२, ८२८३, ८३००, ८३८३, ८३८४, ८४००, ८४८४, ८४८५, ८५००, ८५८५, ८५८६, ८६००, ८६८६, ८६८७, ८७००, ८७८७, ८७८८, ८८००, ८८८९, ८९००, ८९८९, ८९९०, ९०९१, ९१००, ९१९१, ९१९२, ९२००, ९२९२, ९२९३, ९३००, ९३९३, ९३९४, ९४००, ९४९४, ९४९५, ९५००, ९५९५, ९५९६, ९६००, ९६९६, ९६९७, ९७००, ९७९७, ९७९८, ९८००, ९८९८, ९८९९, ९९००. .. | १५,००० | ५,००० |
| ६ | शेवटच्या अनुक्रमांकापासून १००० पेक्षा अधिक असलेल्या कोणत्याही क्रमांकासाठी अतिरिक्त आकारणी. .. | ७,५०० | ४,००० |
| ७ | बिगर अनुक्रमांक असलेल्या म्हणजेच १००० पर्यंतचा जंपिंग क्रमांक असलेल्या कोणत्याही क्रमांकासाठी अतिरिक्त आकारणी. .. | ५,००० | ३,००० |

*( मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पुणे, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, नाशिक या जिल्ह्यांमधील नोंदणी प्राधिकाऱ्यांच्या अधिकारितेत-

(४) कोणतीही विनिर्दिष्ट केलेले नोंदणी चिन्ह वाटपासाठीचा अर्ज कोऱ्या कागदावर करण्यात यावा.

(५) (एक) नोंदणी प्राधिकारी, शासकीय वाहनांना क्रमांक वाटपासाठी नोंदणी मालिका किंवा तिचा भाग राखून ठेवील:

परंतु, पोट-कलम (३) च्या तरतुदींन्वये ज्या क्रमांकासाठी फी विहित केलेली असेल अशा मालिकेतील नोंदणी क्रमांक पोट-नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या फीचे प्रदान केल्यावर कोणत्याही व्यक्तीला वाटप करता येऊ शकेल.

(दोन) ज्या नोंदणी क्रमांकासाठी पोट-नियम (३) च्या तरतुदींन्वये फी विनिर्दिष्ट केलेली असेल अशा फीचे प्रदान केल्याशिवाय असा नोंदणी क्रमांक कोणत्याही शासकीय वाहनाला वाटप करता येणार नाही.

(तीन) विद्यमान मालिका पूर्ण झाल्याखेरीज, शासकीय वाहनांसाठी कोणतीही नवीन नोंदणी मालिका किंवा तिचा भाग सुरू केला जाणार नाही.

(६) विशिष्ट वर्गाच्या किंवा प्रवर्गाच्या वाहनांची नोंदणी मालिका पूर्ण झालेली नसेल तर, नोंदणी प्राधिकाऱ्याकडून त्या वर्गासाठी किंवा प्रवर्गासाठी कोणतीही नवीन मालिका सुरू केली जाणार नाही :

परंतु, अर्जदाराला, पोट-नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या फीच्या तिप्पट असेल इतकी फी ज्याच्याकडे प्रदान करावी लागेल त्या नोंदणी प्राधिकाऱ्याच्या शिफारशीवरून , ०००१ हे नोंदणी चिन्ह नेमून देणारी नवीन मालिका सुरू करण्यासाठी, परिवहन आयुक्ताला लेखी आदेश देता येईल. या मालिकेतील नोंदणी चिन्ह मिळविण्यास इच्छुक असलेल्या अर्जदाराला, त्यानंतर मूळ मालिका पूर्ण होईपर्यंत या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या फीच्या तिप्पट दराने फी प्रदान करावी लागेल. पहिली मालिका पूर्णपणे संपेपर्यंत दुसरी नवीन मालिका एकाचवेळी सुरू करण्यात येणार नाही.

(७) नोंदणी प्राधिकाऱ्याला, पोट-नियम (३) अन्वये त्या क्रमांकासाठी विनिर्दिष्ट केलेल्या फीच्या तिप्पट दराने फीचे प्रदान केल्यावर, वाहनांच्या कोणत्याही वर्गासाठी, इतर कोणत्याही चालू मालिकेतून नोंदणी चिन्हे नेमून देता येतील.

(८) एकदा राखून ठेवलेले नोंदणी चिन्ह बदलून देण्यात येणार नाही आणि ते " प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य " या तत्त्वानुसार काटेकोरपणे नेमून देण्यात येईल :

परंतु, एकापेक्षा अधिक अर्जदारांनी, कोणत्याही विशिष्ट दिवशी, विशिष्ट नोंदणी क्रमांकाची मागणी केली असेल तर, जाहीर लिलावाद्वारे नोंदणी चिन्ह वाटप करता येईल. लिलावाची कार्यपद्धती, शासनाकडून **शासन राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल.

(९) नोंदणी चिन्ह राखून ठेवण्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत वाहन सादर केले नाही तर, राखून ठेवलेले नोंदणी चिन्ह रद्द करण्यात येईल आणि अशाप्रकारे रद्द केलेले नोंदणी चिन्ह, नोंदणी प्राधिकाऱ्याकडून, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या फीसह अर्ज करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीला वाटप करण्यात येईल.

(१०) कोणतेही विशिष्ट नोंदणी चिन्ह राखून ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. शैलेश कुमार शर्मा,
शासनाचे प्रधान सचिव.

**महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५४-अ नुसार नोंदणी क्रमांक नेमून देणेबाबत.**

**परिवहन आयुक्त कार्यालय**
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

**क्रमांक : क्र.एमव्हीआर-०९९३/सीआर-६३२-बी/का.२(५)/जा.क्र.** 4663 **दिनांक-** 8 MAY 2013

वाचा : १) शासन अधिसूचना क्र. एमव्हीआर-०४०८/प्र.क्र.२१२/पुनर्बांधणी-२५/परि-२ दि.२०.०४.२०१३.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.एमव्हीआर-०९९३/सीआर-३६२-बी/का.२(५)/जा.क्र.५७०२ दि.०२.०५.२०१३.
३) या कार्यालयाचे पत्र क्र.एमव्हीआर-०९९३/सीआर-३६२-बी/का.२(५)/जा.क्र.५७५० दि.०३.०५.२०१३.

**परिपत्रक**

शासनाने दिनांक २०.०४.२०१३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या मधील सध्याच्या नियम ५४(अ) ऐवजी नवीन सुधारीत नियम ५४(अ) दाखल केला आहे. सुधारीत नियम दि.१५.०५.२०१३ पासून अंमलात येत आहेत.

२. या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये तसेच ई-मेल द्वारे आपणास अधिसूचनेच्या प्रती आवश्यक कार्यवाहीकरीता पाठविल्या आहेत. तसेच या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.३ नुसार दिनांक २०.०४.२०१३ रोजीच्या अधिसूचनेनुसार पसंतीच्या नोंदणी क्रमांकात व काही ठिकाणी फी मध्ये झालेली वाढ याची योग्य नोंद घेऊन त्याप्रमाणे शुल्क वसुल करावे याबाबत सूचना दिल्या आहेत.

३. सुधारीत नियम ५४(अ) मधील पोट नियम (३) मध्ये पसंतीच्या नोंदणी क्रमांकाची यादी दिलेली असून वाहनाच्या संवर्गानिहाय व प्रकारनिहाय फी विहित केलेली आहे. त्यानुसार फी वसूल करावी.

४. ०००१ या पसंतीचे नोंदणी क्रमांकासाठी कार्यालयनिहाय फी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे वसूल करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कार्यालयांचे नाव | दुचाकी व तीनचाकी आणि परिवहन वाहने यांच्या व्यतिरिक्त |
|---|---|---|
| १ | **गट अ**<br>प्रादेशिक परिहवन कार्यालय, मुंबई (मध्य),(पूर्व), (पश्चिम),<br>उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली.<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे,<br>उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबई, कल्याण व वसई.<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल,<br>उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण.<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड व बारामती.<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद.<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर), नागपूर (ग्रामीण), उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर-पूर्व).<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, कोल्हापूर.<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, नासिक, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, मालेगाव. | फी रु.४,००,०००/- |
| २ | **गट ब**<br>उर्वरीत कार्यालये | फी रु. ३,००,०००/- |

५. दि. १५.०५.२०१३ पूर्वी पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी फी स्विकारुन पसंती क्रमांक आरक्षित करण्यात आला असेल अशा प्रकरणांमध्ये नवीन अधिसूचनेतील तरतूदी लागू होणार नाहीत.

६. पोट नियम (५)(दोन) मधील तरतूदीनुसार शासकीय वाहनास पोट- नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेले नोंदणी क्रमांक फी चे प्रदान केल्याशिवाय नेमून देता येणार नाहीत.

७. सुधारीत नियमातील पोटनियम ६ मधील परंतुकाप्रमाणे विद्यमान मालिका संपलेली नसताना ०००१ हा नोंदणी क्रमांक नेमून देण्यासाठी नवीन मालिका सुरु करण्याचे अधिकार परिवहन आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्याबाबतचे प्रस्ताव नोंदणी प्राधिकाऱ्याच्या स्पष्ट शिफारशीसह व कारणमिमांसेसह परिवहन आयुक्त कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. विद्यमान मालिका पूर्ण होईपर्यंत परिवहन आयुक्तांच्या आदेशाने सुरु केलेल्या मालिकेतील नोंदणी क्रमांक तिप्पट शुल्क आकारुन देता येतील.

८. पोट नियम (३) अन्वये त्या क्रमांकासाठी विनिर्दिष्ट केलेल्या फीच्या तिप्पट दराने फीचे प्रदान केल्यावर, वाहनाच्या कोणत्याही वर्गासाठी, इतर कोणत्याही चालू मालिकेतून पसंती नोंदणी क्रमांक नोंदणी प्राधिकाऱ्यांना त्यांच्या स्तरावर देता येतील. त्याबाबतचे प्रस्ताव या कार्यालयाकडे यापुढे पाठविण्यात येऊ नयेत.

९. सुधारीत नियम ५४-अ नुसार नंबर पोर्टेबिलीटीची तरतूद वगळण्यात आली आहे, याची सर्व नोंदणी प्राधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

१०. पसंतीचा नोंदणी क्रमांक देण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

i) अर्जदार ज्या नोंदणी प्राधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास आहे अथवा ज्या नोंदणी प्राधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात त्याच्या व्यवसायाचे ठिकाण आहे त्याच ठिकाणी वाहनाच्या पसंती क्रमांकासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात अर्ज सादर करेल. (याकरिता केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ४७ मधील तत्व लागू होईल).

ii) अर्जासोबत केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ४ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५अ मध्ये विहित केलेल्या पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल.

iii) अर्जदाराची ओळख पटविण्यासाठी अर्जासोबत अर्जदाराने त्याचे फोटो ओळखपत्र उदा.आधार कार्ड/निवडणूक आयोगाचे ओळखपत्र/पासपोर्ट/पॅन कार्ड इत्यादीची साक्षांकित प्रत सादर करावी लागेल.

iv) पसंतीच्या नोंदणी क्रमांकाचे शुल्काची रक्कम रु.५०,०००/- पेक्षा अधिक असल्यास सदरचे शुल्क राष्ट्रीयकृत बँकेच्या/शेडयूल्ड बँकेच्या धनादेशाद्वारे भरणे तसेच त्यासोबत अर्जदारास पॅनकार्डची साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य असेल.

v) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी अर्जदारास अथवा त्याचे अधिकृत प्रतिनिधीस कार्यालयामध्ये पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० या दरम्यान, अर्ज कार्यालयाच्या आवक विभागात जमा करणे अनिवार्य राहील. त्याच दिवशी आवक झालेल्या सर्व अर्जाची छाननी करुन पसंतीच्या नोंदणी क्रमांकाचे वाटप करावे.

vi) एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही.

vii) 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वानुसार नोंदणी क्रमांक काटेकोरपणे नेमून देण्यात यावे. मात्र एकापेक्षा अधिक अर्जदारांनी पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी अर्ज केल्यास त्याचे जाहीर लिलावाद्वारे वाटप करावे अशी तरतूद आहे. लिलावाची कार्यपध्दती शासनाकडून अधिसूचित करावयाची आहे. अधिसूचना जारी होईपर्यंत नोंदणी प्राधिकारी यांनी अशा प्रकरणात अर्जदारास कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी ४.०० वाजेपर्यंत पोट-नियम (३) मध्ये पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी विनिर्दिष्ट केलेल्या फी पेक्षा जास्त रकमेचे धनाकर्ष (Demand Draft) बंद लिफाफ्यात सादर करण्यास सूचित करावे. जो अर्जदार सर्वात जास्त रकमेचा धनाकर्ष सादर करेल त्यास सदर पसंतीचा क्रमांक देण्यात यावा. उर्वरीत अर्जदारांना धनाकर्ष त्वरीत परत देण्यात यावेत. ज्या व्यक्तीस सदर पंसती क्रमांक देण्यात

आला असेल त्या व्यक्तीचे नाव व त्याने धनाकर्षाव्दारे भरलेल्या शुल्काची रक्कम कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करावी.

viii) नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक रद्द करावा. रद्द केलेला नोंदणी क्रमांक अन्य कोणत्याही व्यक्तीस (पूर्वी फी भरुन नोंदणी क्रमांक रद्द झालेल्या व्यक्तीस सुध्दा) पोट नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या फीसह अर्ज केल्यास, वाटप करता येईल.

ix) कोणतेही विशिष्ट नोदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही.

x) एखाद्या विशिष्ट वर्गाच्या किंवा प्रवर्गाच्या वाहनाची नोंदणी मालिका पूर्ण झाल्याखेरीज त्या वर्गासाठी किंवा प्रवर्गासाठी कोणतीही नवी मालिका सुरु करण्यात येवू नये. मात्र विद्यमान मालिका संपण्याच्या ०७ दिवस अगोदर जनतेच्या माहितीकरिता नवीन मालिका सुरु करण्यात येत असल्याबाबत नोटीस बोर्डवर तसेच स्थानिक वर्तमानपत्रातून याबाबत पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी.

xi) एकच नोंदणी क्रमांक दोन वाहनांना देणे, वाहनाच्या चेसिस व इंजिन क्रमांकामध्ये एक शून्य वाढवून त्याच वाहनाची संबंधित वितरकाने पुन्हा नोंदणी करुन घेऊन त्याच वाहनाला दुसरा नोंदणी क्रमांक प्राप्त करणे यासारखी गंभीर प्रकरणे निदर्शनास आली आहेत. अशा वाहनांचा गुन्हेगारीसाठी होणाऱ्या वापराची शक्यता लक्षात घेता, एकच क्रमांक दोन वाहनांना दिला जाणे ही बाब अतिशय धोकादायक आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या चूका होऊ नये म्हणून संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. वाहनांना आकर्षक/पसंतीचा नोंदणी क्रमांक देण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवावी. त्याकरिता कार्यालयातील वरिष्ठ कर्मचाऱ्याची नेमणूक करुन त्यास या कामाची जबाबदारी सोपवावी. नोंदवहीमध्ये अचूक नोंदी घेऊन वेळीच अद्यावत कराव्यात व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी आढावा घ्यावा.

यापुढे एकच नोंदणी क्रमांक दोन वाहनांना दिल्याचे आढळल्यास संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच वाहन मालकाने/वाहन वितरकाने एकाच वाहनास दोनदा नोंदणी क्रमांक मिळविल्याचे किंवा त्यासाठी मदत केल्याचे उघडकीस आल्यास त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करावा तसेच वितरकाचे व्यवसाय प्रमाणपत्र निलंबित/रद्द करण्यात यावे.

११. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी /उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, वर विहित केलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करुन महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम ५४ (अ) च्या तरतूदींनुसार मोटार वाहनांना नोंदणी क्रमांक नेमून देण्यात यावेत.

**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई,**

**प्रति,**
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.

**प्रत माहितीकरीता सादर -**

प्रधान सचिव, गृह विभाग (परिवहन), जागतीक व्यापार केंद्र, ३० वा मजला, कफ परेड, मुंबई- ४०० ००५.

## पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

**नाव :** --------------------------------

**पत्ता :** --------------------------------

--------------------------------

**मोबाईल/दूरध्वनी क्रमांक :** ---------------

**ई-मेल आयडी :** ------------------------

**दिनांक :** --------------------------

**प्रति,**

प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,

--------------------------------

**विषय :** पसंतीचा नोंदणी क्रमांक मिळणेबाबत.

**वाहनाचा प्रकार :** १) दुचाकी ☐ २) खाजगी चारचाकी ☐ ३) परिवहन वाहन ☐.

(ज्या वाहनासाठी पसंती क्रमांक त्यासमोर ✓ अशी खूण करावी)

महोदय,

मी --------------- या प्रकारचे वाहन विकत घेतले/घेणार असून त्या वाहनासाठी मला माझ्या पसंतीचा नोंदणी क्रमांक --------------------------- मिळावा/ आरक्षित करुन मिळावा म्हणून अर्ज करीत आहे.

२. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५४(अ) मधील तरतूदीनुसार विहित केलेले शासकीय शुल्क भरण्यास तयार आहे.

३. उपरोक्त नियमातील तरतूदीनुसार शुल्क भरुन नोंदणी क्रमांक आरक्षित केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मी वाहन नोंदणीसाठी सादर न केल्यास राखीव ठेवलेले नोंदणी चिन्ह रद्द होईल याची मला माहिती आहे.

४. एकाच दिवशी एकाच पसंतीच्या क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास सदरचा पसंती क्रमांक बंद लिफाफ्यात विनिर्दिष्ट केलेल्या शुल्कापेक्षा जास्त रकमेचा धनाकर्ष (Demand Draft) सादर केल्यानंतर जाहीर लिलावाव्दारे जास्तीत जास्त रकमेचा धनाकर्ष (Demand Draft) सादर करणाऱ्याला देण्यात येईल याचीदेखील मला माहिती आहे.

५. एकदा आरक्षित केलेला नोंदणी क्रमांक रद्द करता येणार नाही/ बदलता येणार नाही अथवा त्याकरिता प्रदान केलेले शुल्क परत मिळणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही याचीदेखील मला माहिती आहे.

६. अर्जासोबत मी खाली नमूद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडत आहे.

अ) पत्त्याचा पुरावा : ---------------------------------------------

ब) पॅन कार्ड क्रमांक : ----------------------------- (शुल्क रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास)

क) ओळखपत्र (फोटो आय.डी.): ---------------------

(उदा. ड्रायव्हींग लायसन्स, पासपोर्ट, आधार कार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र इत्यादी)

७. आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यात यावा.

आपला विश्वासू,

(----------------------------)